


दैनिक **महाराष्ट्र सम्राट**

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे




ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

## तापमान

कमाल ३६° से | किमान २९° से

## बाजार

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

## डोकं खाजवा –अशोक सुतार



मते दिली नाहीत तर त्या योजनेचा लाभ मिळणार नाही, असे मी तुमच्या फायद्यासाठीच म्हणालो. त्यामुळे वाद होऊन अखेर तम्हाला


## थोडक्यात घडामोडी

### आज 'सुपर ब्लू मून'चं दर्शन होणार

आज चंद्राचं रुप आणखी खुलणार आहे... कारण आज 'सुपर ब्लू मून'चं दर्शन भारतीयांना होणार आहे. रक्षाबंधनाच्या दिवशीच आकाशात चंद्राचे मनोहारी रूप पाहायला मिळेल.. उद्या ११ वाजून ५५ मिनिटानं ब्लू मूनचं दर्शन होणार आहे... चंद्रही सर्वांत मोठा आणि अधिक तेजस्वी दिसणार आहे... एकाच महिन्यात दोन पौर्णिमा असतात, तेव्हा दुसऱ्या पौर्णिमेला 'ब्लू मून' म्हणतात.. यावेळी सामान्य पौर्णिमे पेक्षा चंद्र १४ टक्के मोठा आणि ३० टक्के अधिक तेजस्वी दिसतो.

### म्हाडाचा अर्ज भरण्यासाठी होणार मार्गदर्शन

मुंबई–म्हाडाचा अर्ज कसा भरायचा यासाठी खास एकदिवसाचा वेबिनार पार पडणारेय... म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळातर्फे उद्या म्हणजेच १९ ऑगस्टला दुपारी १२ वाजता लाईव्ह वेबिनार आयोजित करण्यात आलाय.या वेबिनारच्या माध्यमातून अर्जदारांना पडलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळणार आहे. म्हाडाच्या लॉटरीसाठी अर्जदारांना अधिक सुलभतेने अर्ज सादर करता यावेत यासाठी या वेबिनारचं आयोजन करण्यात आलंय.



# महाराष्ट्रात गुलाबी राजकारण!

महाराष्ट्राच्या राजकारणात गुलाबी राजकारण पाहायला मिळत आहे. महिलांना आवडता रंग म्हणून गुलाबी रंग म्हणून सर्वांना माहिती आहे. लाडकी बहिण योजनेच्या अंतर्गत महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा झाले आहेत. त्यामुळे या लाडक्या बहिणींना रक्षाबंधनापूर्वी युती सरकारने ओवाळणी दिली आहे. त्यातच निवडणुकीचे बिगुल वाजले असल्यामुळे युती सरकारनेही रणशुंग फुंकले आहे. यासाठी महाराष्ट्राभर युती सरकारचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री प्रचाराला लागले आहेत. सर्व सभांमध्ये लाडक्या बहिणींचा बोलबाला दिसत आहे. या योजनेंचा युती सारकरला मोठा फायदा होईल, असेच सर्वत्र बोलले जात आहे. त्यातच अजित पवार यांनी गुलाबी जॅकेट, गुलाबी बॅनर, गुलाबी स्टेज आणि आता गुलाबी रिक्षा... अजित पवारांच्या राष्ट्रवादीने सर्व राजकारणच गुलाबी रंगात रंगवून टाकले आहे. तसेच अजित पवारांच्या पाठोपाठ देवेंद्र फडणवीसांनाही गुलाबी रंगाची भुरळ पडल्याचे दिसत आहे. तसा बदल देवेंद्र फडणवीस यांच्या ड्रेसिंग स्टाईलमध्ये पहायला मिळत आहे. महाराष्ट्रात सुरु असलेल्या या गुलाबी राजकारणाची चांगलीच चर्चा रंगली आहे.

## लाडकी बहीण योजनेचे पैसे हळूहळू तीन हजार करणार




सातारा : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी **(पान २ वर)**

### १७ ऑगस्ट लाडकी बहीण दिवस

लाडक्या बहिणींबरोबरच शासन युवक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी अशा सर्वांनाच बळ देत आहे. त्यासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्ण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना या योजनांना गती देण्यात येत आहे. विविध योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शासन प्रयत्न करित आहे. यावेळी त्यांनी १७ ऑगस्ट हा दिवस 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण दिवस म्हणून आपण सर्वांनी साजरा करुया आणि या योजनेचे स्मरण सदैव ठेवूया, असे आवाहनही मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

## लोकसभेसारखा दणका देऊ नका रे बाबांनो, लय वाईट वाटतंय




पुणे – उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. आनंद, दुख, राग, माफी जे मनात येईल ते मनमोकळेपणाने बोलतात. नुकतेच एका भाषणादरम्यान अजित पवारांनी आपल्या मनातील खंत बोलून दाखवली. लोकसभेसारखा दणका देऊ नका रे बाबांनो, लय वंगाळ (वाईट) वाटतंय, असे अजित पवार म्हणाले. पुण्यातील मंचर येथील भाषणात ते बोलत होते. **(पान २ वर)**

### सरडा, ढेकूण म्हणून राज्याचा कायापालट होणार आहे का?

सरडा आणि ढेकूण म्हणून राज्याचा कायापालट होणार आहे का? असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विरोधकांना विचारला आहे. अजित पवारांनी गुलाबी रंगाला आपलंसं केलं. यावरून सरडा ही रंग बदलतो अशी खोचक टीका शिवसेनेचे नेते संजय राऊतांनी केली होती. त्याला उत्तर देताना अजित पवारांनी हा सवाल उपस्थित केला. कोण आम्हाला शिव्या देतंय, कोण आम्हाला शाप देतंय तर कोण कोणाला सरडा म्हणतंय अन कोण कोणाला ढेकूण म्हणतंय. पण यामुळं राज्याचे प्रश्न सुटणार आहेत का? राज्याचा कायापालट होणार आहे का? याचं उत्तर विरोधकांनी द्यावं, असं आवाहन अजित पवारांनी केलं. जनसन्मान यात्रेदरम्यान पुण्यातील आंबेगाव विधानसभेत अजित पवारांनी विरोधकांवर असा निशाणा साधला.

## विरोधकांकडे लाडका मुलगा, मुलगी योजना–फडणवीस



मुंबई – काही नादान बोलतात, १५०० रुपयांत तुम्ही विकत घेऊ शकत नाही. बहिणीचं प्रेम कुणी खरेदी करू शकत नाही. १५ कोटी देऊनही हे प्रेम खरेदी करू शकत नाही. ज्या प्रेमाने आपल्याला ऊर्जा मिळतेय. त्या बहिणींना ओवाळणी म्हणून देण्याचा १५०० रुपये देण्याचा प्रयत्न आहे. दरवर्षी ही ओवाळणी आम्ही देऊ. राखी हे कवच आहे. हे कवच घेऊन पुन्हा मैदानात उतरणार आहे असं सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला.मुंबईत आयोजित लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमात फडणवीस उपस्थित होते. यावेळी अनेक महिलांनी देवेंद्र फडणवीसांना राखी बांधली. त्यात चिमुकलीही गर्दीतून वाट काढत स्टेजजवळ पोहचली तेव्हा सुरक्षा रक्षकांना सांगून फडणवीसांनी या चिमुकलीला व्यासपीठावर बोलावून घेतले. यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज या सभागृहात जेवढी गर्दी आहे तितकीच सभागृहाबाहेर आहे. **(पान २ वर)**

# राज्यातील खड्डेमुक्तीसाठी ३१ ऑगस्टपर्यंतची डेडलाइनच; दर सोमवारी अहवाल सादर करा, अन्यथा...



मुंबई : तोंडावर आलेला गणेशोत्सव आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रस्ते आणि पुलांवरील खड्ड्यांमुळे सरकारची प्रतिमा मलीन होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. कोणतीही सबब न सांगता मुंबईसह राज्यातील रस्ते आणि पूल येत्या ३१ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करा, तसेच खड्डेमुक्त केलेल्या रस्त्यांचे आणि पुलांचे फोटोसहित अहवाल दर सोमवारी सरकारला सादर करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. कामात हलगर्जीपणा आणि दिरंगाई केल्यास कारवाई करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.राज्यात यंदा जोरदार पाऊस झाल्याने बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव **(पान २ वर)**

### आदेशात काय?

३१ ऑगस्टपर्यंत खड्डे पूर्णतः बुजवले गेले पाहिजेत. खड्डे भरण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी. गणेशोत्सवापूर्वी राज्यभरातील सर्व क्षेत्रीय अभियंता आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची अद्ययावत माहिती संकलित स्वरूपात जमा करावी.

अतिवृष्टीमुळे झालेल्या रस्त्यांच्या पुलांचा आढावा घेऊन खड्डे व दुरुस्तीची कामे त्वरित हाती घ्यावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने गणेशोत्सव काळात रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत राहतील, याची काळजी घेऊन त्याचे नियोजन करावे.

### २०० किलोमीटरची पाहणी; अहवाल सादर करा

मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता यांनी प्रत्येक आठवड्यात दोन दिवस, तर कार्यकारी अभियंता यांनी आठवड्याच्या तीन दिवस रस्ते आणि पुलांची किमान दोनशे किलोमीटरपर्यंत पाहणी करावी. खड्डेमुक्त रस्ते आणि पूल कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्य अभियंत्यावर असणार आहे. राज्यातील बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते व राष्ट्रीय महामार्गांना या सूचना लागू राहतील, असेही या अध्यादेशात नमूद केले आहे.

## कधी भेटणार न्याय....!




दिवा–मुंबई लोकल सुरु करण्यासाठी समाजसेवक अमोल केंद्रे यांच तिसऱ्या दिवशीही उपोषण सुरुच.... प्रशासनाच दुर्लक्ष... तर दिवेकरांसाठी केंद्रे यांची जीवाची बाजी.... मुंबई सह ठाण्यातील अनेक संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला आहे.

# १०० एकर वनजमीन घोटाळ्याचा पर्दाफाश होणार

**ठाणे – ठाणे शहरात सुमारे १०० एकर जमिनीचा घोटाळा झाला आहे. शंभर एकरची वन जमीन अवघ्या ३१ कोटींमध्ये विकण्यात आली असून त्यामध्ये अधिकारी, एका ट्रस्टचा ट्रस्टी आणि बिल्डर यांचा सहभाग आहे. या संदर्भात आपण न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी रविवारी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून ठाण्यात झालेल्या वनजमिनीचा घोटाळा उघडकीस आणण्याचे सूचक विधान केले आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ठाण्यामध्ये येत्या काही दिवसांतच एक मोठा स्कॅम उघडकीस येणार आहे.महाराष्ट्र राखीव वने असलेली जमीन एका मोठ्या ट्रस्टच्या मुख्य ट्रस्टीने विकण्याचे कारस्थान केले आहे आणि त्यामध्ये सगळे अधिकारीही सामील झालेले आहेत. ३१ कोटी रूपयांमध्ये ही जमीन विकण्यात आलेली आहे. पण, राखीव वने विकण्याचा अधिकार कोणाला आहे? त्यास परवानगी देण्याचा अधिकार कोणाला आहे? अन् यामध्ये ट्रस्टी, परवानगी देणारे, विकत घेणारे या सर्वांनी मिळून हा घोटाळा केला आहे. हा घोटाळा लवकरच संपूर्ण कागदपत्रांसह कायदेशीररित्या उघड केला जाईल आणि याबाबत उच्च न्यायालयात याचिकादेखील दाखल करण्यात येईल. जवळपास १०० एकर पेक्षा अधिक ही जमीन असून या ट्रस्टचे अनेक फ्रॉड पोलिसांनी पकडलेले आहेत. ही जमीन कोणाची असेल, हे त्या बिल्डरला हे ट्वीट वाचल्या–वाचल्या लगेच समजेल! डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या पोस्टमध्ये कोणाचेही नाव घेतले नसले तरी या घोटाळ्यात कोण सहभागी असावे, कोणता ट्रस्ट याची चर्चा रंगली आहे.



डॉ. आव्हाड यांचे ट्वीट

■ **कातकरी समाजाच्या कुटुंबाना हक्काची घरे मिळणार, स्वतःची जमीन देऊन सोडविला प्रश्न : रवींद्र चव्हाण** (सविस्तर वृत्त पान ४)

## वाशी टोलनाक्यावर मनसेचा राडा, टोल अधिकाऱ्यांना लगावली कानशिलात

नवी मुंबई – मनसे कामगार संघटनेच्या कार्यकत्यांनी वाशीतील टोल नाक्यावर आज राडा घालत अधिकाऱ्याच्या कानशिलात लगावली आहे. काही दिवसापूर्वी वाशी टोल नाक्यावर कामगारांच्या पगारात कपात करण्यात आली होती. मनसे कामगार संघटनेच्या कार्यकत्यांनी वाशीतील टोल नाक्यावर आज राडा घालत अधिकाऱ्याच्या कानशिलात लगावली आहे. काही दिवसापूर्वी वाशी टोल नाक्यावर कामगारांच्या पगारात कपात करण्यात आली होती. त्यानंतर आज मनसे पदाधिकारी आणि टोल प्रशासनामध्ये बैठक झाली. या बैठकीत मनसे कामगार संघटनेने मनसे स्टाईलने राडा घातला. टोल प्लाझा वरील कामगारांची पगार कपात केल्याने मनसे कार्यकर्त्यांनी टोल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या थेट कानशिलात लागवली आहे.




■ पश्चिम बंगाल मधील कोलकता येथील रुग्णालयात महिला डॉक्टरवर पाशवी अत्याचार करून तिची नृशंस हत्या केल्याच्या निषेधार्थ देशभरात डॉक्टरांचा बेमुदत संप सुरू असताना शनिवारी सायंकाळी ठाणे केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्यावतीने खोपट कार्यालय येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी, नराधम आरोपीला नागरीकांच्या हवाली करावे तसेच, प.बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली.जर नराधम आरोपींवर कारवाई झाली नाही तर एक दिवस केमिस्ट दुकाने बंद ठेवण्याचा इशारा देण्यात आला. (छाया – मनोज सिंह)

भारतीय बाजारपेठेला अच्छे दिन!

# रक्षाबंधन आधीच व्यापारांना मोठा नफा

**सणासुदीत अर्थव्यवस्था तेजीत**

**देशातील बाजारपेठेत रक्षाबंधन सणामुळे मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. यंदा चीनी सामानावर बहिष्कार टाकत भारतीय वस्तूंना ग्राहकांनी पसंती दिली आहे.**

**मुंबई : श्रावण महिना सुरु झाला आहे. श्रावणातील पहिला सण म्हणजे भाऊ आणि बहीणीच्या अतूट प्रेमाचा सण म्हणून रक्षाबंधनकडे पाहिले जाते. बाजारात रक्षाबंधन निमित्ताने महिलांची मोठी गर्दी उसळलेली पाहायला मिळत आहे. द कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडस यांनी माहिती दिली आहे की जवळपास १२ हजार करोडची आर्थिक उलाढाल रक्षाबंधन निमित्ताने भारतीय बाजारपेठेत झाली आहे. व्यापारी संघटनेचे म्हणणे आहे. यंदा बहिणीचा रक्षाबंधनसाठी भारतीय वस्तू विकत घेण्याचा कल वाढला आहे. मागील काही वर्षापासून साध्या धाग्याचा आकर्षक राखी विकत घेण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. मागील काही वर्षात चायना उत्पादित मालावर भारतीय बाजारपेठेत धूळ खात पडला आहे.**



ऑल इंडिया ट्रेडर्स संघटनेचे सेक्रटरी आणि खासदार प्रवीण खंडेवाल यांनी माहिती दिली की यंदा फक्त चांदणी चौकातून तब्बल १२ हजार करोडची उलाढाल झाली आहे. मागील वर्षात १० हजार करोडची उलाढाल रक्षाबंधनच्या वेळी झाली होती.२०२२ मध्ये साधारण ७ हजार करोड २०१२ मध्ये ६ हजार करोड इतकी उलाढाल रक्षाबंधन सणाच्या निमित्ताने झाली होती. यंदा मात्र तब्बल १२ हजार करोडची उलाढाल फक्त दिल्लीतील चांदणी चौकमध्ये झाली आहे.

ऑल इंडिया ट्रेडर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी, भारतीय म्हणाले की देशभरातून काही विशिष्ट राख्यांना मागणी वाढली आहे. यामध्ये नागपूरची खादी राखी, पुण्यातील बियाण्याने बनवलेली राखी, सटाणावरुन लाकडापासून बनवलेली राखी, दुर्गम भागात बांबू पासून निर्मित केलेल्या राखी, मुंबईतून सिल्क राखी अशा राख्यांना मागणी वाढली आहे. याशिवास देशप्रेम दर्शवणाऱ्या **(पान २ वर)**

# नवी मुंबईच्या विकासासाठी, माता भगिनींच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध - लोकनेते आ. गणेश नाईक

नवी मुंबई - लाडकी बहीण योजना सुरू करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'लाडक्या बहिणींचा देवाभाऊ' या कार्यक्रमाला नवी मुंबईत लाडक्या बहिणींची प्रचंड उपस्थिती लाभली. भाजपा नवी मुंबई महिला मोर्चाच्या वतीने कोपरखैरणे येथे आयोजित या कार्यक्रमास पाच हजारांच्या आसपास लाडक्या बहिणी एकत्र आल्या होत्या. फटाक्यांची आतिशबाजी, संगीत, ढोल ताशांच्या गजरात लाडकी बहिण योजनेचा आनंद साजरा करण्यात आला.

लोकनेते आमदार गणेश नाईक यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली. माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, भाजपा प्रदेश महिला उपाध्यक्ष प्राध्यापिका वर्षा भोसले, माजी महापौर जयवंत सुतार, नवी मुंबई भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा माधुरी सुतार, महामंत्री नेत्रा शिर्के यांच्यासह महिला लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होत्या.

'लाडक्या बहिणींचा देवाभाऊ' या कार्यक्रमांतर्गत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमधील लाडक्या बहिणीशी ऑनलाइन संवाद साधला. लाडकी बहीण योजनेसाठी महिलांनी देवा भाऊंचे आभार मानले. या योजनेमुळे आम्हाला आधार मिळाला असून ही योजना सुरूच ठेवण्याचे आवाहन महिलांनी केले त्याचबरोबर भाऊ म्हणून राज्यातील बहिणींच्या पाठीशी उभे राहण्याची विनंती केली. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी योजना सुरूच राहणार असून लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे त्यांच्या सक्षमीकरणांच्या योजना हाती घेऊ शकलो. देशाचा विकास करायचा असेल तर महिला भगिनींना विकासाच्या मुख्य धारेत आणणार असल्याची ग्वाही दिली.

**■लाडकी बहीण योजनेत देवेंद्र फडणवीस यांचा सिंहाचा वाटा- लोकनेते आ. गणेश नाईक -** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासपुरुष असून शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, जेष्ठ, दिव्यांग अशा सर्व घटकांचे कल्याण त्यांनी केले आहे. लाडकी बहीण योजनेमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असून ही योजना कायमस्वरूपी सुरू राहणार आहे, असे लोकनेते आमदार गणेश नाईक म्हणाले.





**■ नवी मुंबईच्या हितासाठी कटिबद्ध -**
नवी मुंबईमधील सुजान जनतेने एखाद्या नेतृत्वाच्या हातामध्ये २५ वर्षे एका शहराचा कारभार देणं, नवी मुंबई हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे. नवी मुंबईच्या विकासासाठी आणि नवी मुंबईकरांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही लोकनेते आमदार नाईक यांनी यावेळी दिली. महापालिकेच्या माध्यमातून नवी मुंबईसाठी मोरबे धरण विकत घेण्याचा निर्णय घेतल्याने आज शहरातील माता-भगिनींना पाण्यासाठी त्रास होत नाही. नवी मुंबईची पाणीपुरवठ्याची कायमची तरतूद करण्यासाठी २००० एमएलडी क्षमतेचा भिरा पाणी प्रकल्प सुचवला आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे. वीस वर्षे मालमत्ता कर आणि पाणीपट्टी वाढू देणार नाही हा शब्द दिला होता तो शब्द पाळला. पुढील वीस वर्षे देखील कोणत्याही प्रकारची करवाढ होऊ देणार नाही. नवी मुंबईतील ५०० चौरस फुटापर्यंतच्या निवासी घरांना मालमत्ता करमाफीचा निर्णय शासनाकडून मंजूर करून घेतला आहे. एनएनएमटीच्या बसेस मध्ये ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा आहे. मराठी आणि हिंदी भाषा सक्तीची ठेवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यात येत असून सर्वसामान्य घरातील मुले देखील या शाळांमधून शिक्षण घेत प्रगती करतील. नवी मुंबई शहराच्या भविष्यकालीन नागरी गरजांची पूर्तता करण्यासाठी सिडकोने सुविधा भूखंड द्यावेत यासाठी विधानसभेत आवाज उठवला त्या अनुषंगाने देखील सकारात्मक कार्यवाही होणार आहे. प्रकल्पग्रस्त आणि झोपडपट्टी धारकांची आजपर्यंतची गरजे पोटीची सर्व बांधकामे मालकी हक्कासह नियमित करून त्यांच्या इच्छेनुसार विकास योजना शासनाने राबवावी असे नमूद करून लोकनेते आमदार नाईक यांनी नवी मुंबईचा भविष्यकाळ उज्वल आहे. नवी मुंबईच्या विकासासाठी आणि माता भगिनींच्या सक्षमीकरणासाठी कटीबद्ध असल्याचा शब्द उपस्थित लाडक्या बहिणींना दिला.

**■ राज्यात देवा भाऊ तर नवी मुंबई दादा बहिणींचे रक्षणकर्ते - प्रा. वर्षा भोसले -** कार्यक्रमाची प्रस्तावना करताना उपाध्यक्षा प्राध्यापिका वर्षा भोसले यांनी राज्यामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देवा भाऊ आणि नवी मुंबईत लोकनेते आमदार गणेश नाईक आपल्या सर्वांचे दादा बहिणींचे रक्षणकर्ते असल्याचे सांगितले. देशाचे विकास पुरुष पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आहेत. महाराष्ट्राचे विकास पुरुष उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आहेत तर आपल्या व्हिजनरी नेतृत्वाने नवी मुंबईला प्रथम क्रमांकाचे शहर बनविणारे लोकनेते आमदार नाईक नवी मुंबईचे विकास पुरुष असल्याचे त्या म्हणाल्या.

- 'लाडक्या बहिणींचा देवाभाऊ' कार्यक्रमाला नवी मुंबईत लाडक्या बहिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद
- नवी मुंबईचे लाडके 'दादा' लोकनेते आ. गणेश नाईक यांना भगिनींनी बांधल्या राख्या

**■लाडक्या बहिणींनी लाडक्या दादांना बांधल्या राख्या -** नवी मुंबईतील सर्वच्या सर्व १११ प्रभागातून आलेल्या लाडक्या बहिणींनी आपले लाडके भाऊ लोकनेते आमदार गणेश नाईक, माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी आमदार तथा नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक यांना राख्या बांधल्या. या बहिणीच्या संरक्षणाची आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी वचनबद्ध असल्याचे लोकनेते आमदार नाईक यांनी सांगितले. सीमा मिश्रा, राजश्री, सुषमा, राणी या भगिनींनी लेक लाडकी योजनेसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तर नवी मुंबईत लाडक्या बहिणींसाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देणारे, त्यांच्या सुखदुःखाला धावून जाणारे लोकनेते आमदार गणेश नाईक यांचे आभार मानले.

## लोकसभेसारखा दणका देऊ नका रे बाबांनो, लय वाईट वाटतंय

**(पान १ वरून)** लोकसभेसारखा दणका आगामी विधानसभेत देऊ नका बेंबीच्या देठापासून अगदी घाम निघेपर्यंत ओरडून सांगतोय पण समोरच्यांनी देवळात वाजवायची घंटा माझ्या हाती दिली, अशी खंत वजा साद उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मतदारांना घातली. जनसन्मान यात्रेदरम्यान पुण्यातील आंबेगाव विधानसभेत बोलताना झालेल्या चुकांची मी माफी मागितली आहे. आता तुमच्या कांदा, टोमॅटो वर कधीचं निर्यात बंदी आणणार नाही, पंतप्रधान नरेंद्र मोदींना तसं आवर्जून सांगितलं आहे. उसाला ही चांगला दर देतोय. माझं काम बोलतं काम अन आपलं कामचं भारी असतं. फक्त लोकसभेसारखा दणका आगामी विधानसभेत देऊ नका, अशी साद अजित पवारांनी मतदारांना घातली आहे. **चूक मान्य -** जुलै २०२३ मध्ये अजित पवारांनी शरद पवारांची साथ सोडली. यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत बारामती मतदारसंघ चर्चेत राहिला. कारण येथे सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत पाहायला मिळाली. पवारांच्या घरातील एक मुलगी आणि एक सून एकमेकींच्या विरोधात उभ्या राहिल्या. यात सुनेत्रा पवार यांचा पराभव झाला. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळेंविरोधात सुनेत्रा पवारांना उमेदवारी नको द्यायला हवी होती, असे देखील अजित पवारांनी बोलून दाखवले. ती आपली चूक झाल्याचे ते म्हणाले. सगळ्याच माझ्या लाडक्या बहिणी आहेत आणि राजकारण घरात शिरु द्यायचं नसतं असंही वक्तव्य केलं आहे.

## विरोधकांकडे लाडका मुलगा, मुलगी योजना-फडणवीस

**(पान १ वरून)** जर इतक्या मोठ्या संख्येने सभागृहात महिला जमल्या तर चेंगराचेंगरी होईल असं पोलीस म्हणाले. त्यामुळे या महिलांनी निराश होऊ नका, तुम्हाला या सभागृहात जागा मिळाली नसली तरी माझ्या हृदयात बहिणींसाठी जागा आहे. विकसित भारत घडवायचा असेल भगिनींना मुख्य धारेत आणल्याशिवाय भारत विकसित होऊ शकत नाही. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत, स्वत:च्या पायावर उभं राहू शकणार नाही तोपर्यंत भारत विकसित होणार नाही. त्यामुळे मोदी सरकारने महिला केंद्रीत धोरण पुढे आले आहे. महिलांच्या जीवनात परिवर्तन होतंय. आता पुढच्या काळात २०२७ नंतर जितक्या निवडणुका होतील तिथे महिला प्रतिनिधित्व मिळणार आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेत १०० महिला प्रतिनिधी पाहायला मिळतील तर लोकसभेत त्याहून दुप्पट महिला प्रतिनिधित्व दिसेल असं त्यांनी सांगितले. दरम्यान, लाडका मुलगा, लाडकी मुलगी हीच योजना विरोधकांकडे आहे. मुख्यमंत्री झालं तर माझा मुलगा, माझी मुलगी असं त्यांचे आहे. मात्र राज्यातील सर्व महिला एक सोडून माझ्या भगिनी आहेत. आज महायुती सरकारने मुलींसाठी उच्चशिक्षण मोफत केले आहे. आज महिलांना वर्षाला ३ सिलेंडर मोफत देण्याचीही योजना आणली आहे. लेक लाडकी योजना आणली घरी मुलगी जन्माला आली तर सुरुवातीला ५ हजार आणि १८ वर्षापर्यंत १ लाख रुपये मुलीला मिळतील अशी योजना आणली आहे. राज्यातलं महायुती सरकार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार असेल मी असेन, मंत्रिमंडळ असेल, आमदार असतील अहोरात्र तुमच्यासाठी काम करतोय. आज महाराष्ट्रात काही लोक बोलबच्चन देतात. जेव्हा देण्याची वेळ येते तेव्हा कुणी देत नाही. हे सरकार आले तर वसुली करतात. या लोकांची तोंड रावणासारखी आहेत. दहा तोंडाने खोटं बोलतात. मात्र रयतेची सेवा करणे हाच आपला धर्म आहे असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेचे पैसे हळूहळू तीन हजार करणार

**(पान १ वरून)** ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल तसे सद्यस्थितीत असणारी दरमहा दीड हजार रुपयांची रक्कम वाढवत जावून टप्या-टप्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना दिली. सातारा येथील सैनिक स्कूलच्या मैदानावर मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण लाभार्थी सन्मान सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. त्यामुळे, लाडक्या बहिणींना आणखी एक गुडन्यूज मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महिला जोपर्यंत सशक्त होत नाही तोपर्यत अर्थव्यवस्था बळकट होत नाही. महिलांना पैसे कुठे कसे खर्च करावे चांगले कळते. या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. यातून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग करुन महिला लहान मोठे उद्योग सुरु करतील. राज्याच्या एकूण विकासाच्या दृष्टीने ही योजना महत्वपूर्ण ठरेल. त्यामुळे ही योजना कायमस्वरुपी सुरु ठेवण्यात येणार असून ती कधीही बंद पडणार नाही. दरमहा दीड हजार रुपयांची रक्कम वाढत जावून टप्या-टप्यापर्यंत तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल. शासन बहिणींसाठी हक्काचे माहेर आहे आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून मिळणारी ही ओवाळणी राज्यातील बहिणींना दरमहा मिळत राहणार असल्याचेही यावेळी शिंदेंनी सांगितले. माझी ताई कष्ट करते, शेतात राबते याची आम्हांला जाणीव आहे, अशा कष्टकरी बहीणींसाठी ही योजना सुरु करण्यात आली असून आत्तापर्यंत राज्यात १ कोटी बहिणींच्या खात्यात ३ हजार कोटी रुपये जमा झाले आहेत.

## रक्षाबंधन आधीच व्यापारांना मोठा नफा

**(पान १ वरून)** राख्यांना सुद्धा मागणी वाढली. उदा: तिरंगा राखी, वसुधैव कुटुंबकम राखी, भारत माता राखी यांची सुद्धा मागणी वाढली आहे.तसेच चांदीच्या राख्याचा खप सुद्धा वाढला. बाजारात सराफाच्या दुकानात तेजी आली आहे. ऑल इंडिया ट्रेडर्सचेच्या अनुमानानुसार १९ ऑगस्ट ते १५ नोव्हेंबर तुळशी विवाह पर्यंत भारतीय बाजारपेठेत ४ लाख करोडची उलाढाल होण्याची शक्यता आहे. यंदा रक्षाबंधन नंतर दहीहंडी, गणेश उत्सव, नवरात्री, दसरा, दिवाळी अशी सणांची एकामोगमाग एक अशी लाइन लागली आहे. याच पार्श्वभूमीवर बाजारात आर्थिक उलाढालींना वेग आला आहे.

## राज्यातील खड्डेमुक्तीसाठी ३१ ऑगस्टपर्यंतची ...

अवघ्या पंधरा दिवसांवर आल्याने बाप्पाचे आगमन खड्डेमय रस्त्यातून होणार आहे. मुंबईसह राज्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी मागील आठवड्यात दिले होते; परंतु अद्याप पूल आणि रस्त्यांवरील खड्डे पूर्णपणे बुजवण्यात येत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे येत आहेत. रस्त्यांवर खड्डे पडल्याने सरकार विरोधात लोकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.


Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/12587/18/24
Inquiry/case No. : ACC/III/808/2024
Name of the Trust : द्वारकामाई चॅरिटेबल ट्रस्ट
**Address of the Trust :** रूम नं. ३०६, बी-विंग, श्रीराम अपार्टमेंट, तिसागाव, कल्याण (पूर्व), ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** कु. शितल विनोद पाटील.

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 14/08/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/00719/18/24
Inquiry/case No. : ACC/III/152/2024
Name of the Trust : दुर्गा माता ट्रस्ट
**Address of the Trust :** गाला नं. १, बाळ्यामामा नगर, आंबेडकर चौकाजवळ, उभांर्णी, ता. कल्याण (पूर्व), ठाणे, ठाणे, ठाणे
**Name of the Applicant :** श्री. एकनाथ नाऊ पवार,

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.
This notice given under my hand and seal of the Office on this date 14/08/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



**नवी मुंबई महानगरपालिका**

**सार्व.आरोग्य अभियांत्रिकी विभाग**

**निविदा सुचना क्र.-नमुंमपा/कार्यकारी अभियंता(पाणीपुरवठा)/07/2024**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | वाशी विभागातील सेक्टर 9,10,15,17,1ए, वाशीगांव येथे गणपती विसर्जनासाठी बनविण्यात येणा-या कृत्रिम तलवामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे (श्रीगणेश विसर्जन-2024) | 3,32,413/- |
| 2 | वाशी विभागातील सेक्टर 12,28,29,14,11,(जुहूगांव) येथे गणपती विसर्जनासाठी बनविण्यात येणा-या कृत्रिम तलावामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे (श्रीगणेश विसर्जन-2024) | 3,31,798/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.19/08/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा)**

**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/224/2024 नवी मुंबई महानगरपालिका**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग
दुसरी मुदतवाढ निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती औषधी भांडारातर्फे महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्र यांना दैनंदिन वापरासाठी लागणा-या लसी खरेदीसाठी आल्या होत्या.सदर निविदेस दि.२०.०८.२०२४ ते दि.२६.०८.२०२४. दुसरी मुदतवाढ देण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in दि.२०.०८.२०२४ ते दि.२६.०८.२०२४ रोजी १६:०० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्विकारण्यात येतील दि.२६.०८.२०२४ रोजी १६.३० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/२९८/२०२४-२५ सही/-
दि:१६.०८.२०२४ उप-आयुक्त (आरोग्य)
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**



**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**तृतीय मुदतवाढ**
निविदा सूचना क्रमांकः- ठा.म.पा./विद्युत/नि.सू./७५/२०२३-२०२४

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा येथील १६ पॅसेंजर दोन उद्वाहनांची व्दिवार्षिकनिगा , देखभाल व दुरुस्ती करणेबाबतच्या कामी तृतीय मुदतवाढ मागविणेबाबत या कामांकरिता निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि. १९/०८/२०२४ ते २६/०८/२०२४ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. सदरच्या निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि.२६/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेंपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. २६/०८/२०२४ रोजी उघडण्यात येतील निविदा सुचना आणि प्रपत्र ठाणे महानगरपालिकेची अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/विद्युत-मु/३०५/२०२४-२५ सही/-
दि:१६.०८.२०२४ उपनगर अभियंता (विद्युत)
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**



**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION**
**BHIWANDI (Dist. Thane) MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी - ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/१०४४
दि. १६/०८/२०२४

**बांधकाम विभाग**

**फेर ई-निविदा सुचना क्र.५० सन २०२४/२५**

खालील काम करण्यासाठी सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | अंदाजित खर्च/निविदा फॉर्म फी/कामाचे स्वरुप | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यक्षेत्रात पावसाळ्यानंतर मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्त करणे. (वार्षीक निविदा २०२४-२५) | ४९,९९,२३८/- | दिनांक :-१९/०८/२०२४ दिनांक :- २६/०८/२०२४ |
| २ | प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात पावसाळ्यापूर्वी मुख्य व अंतर्गत रस्ते डांबरीकरणाने (पॅचवर्क पध्दतीने) दुरुस्त करणे. | ४९,९८,४९०/- | |

सदर निविदा बाबतची माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१९/०८/२०२४ ते दि.२६/०८/२०२४ रोजी पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थाळावर दि.२६/०८/२०२४ रोजी दु. ३.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

सही/-
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.



**मिरा भाईंदर महानगरपालिका**
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/आस्था/१४५३/२०२४-२५ दि. १६/०८/२०२४

।। जाहीर निविदा सूचना ।।

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने मजूर उपलब्ध करुन देणेकरीता नोंदणीकृत कंत्राटदार / नोंदणीकृत संस्थेमार्फत इच्छुक ठेकेदार यांचेकडून ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा मागविणेत येत आहे. सदर निविदा फॉर्म दि. २०/०८/२०२४ ते दि. ३०/०८/२०२४ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध होतील. सदर निविदा पत्रक / निविदा फॉर्म दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत याच संकेतस्थळावर सादर करावयाचे आहेत. इच्छुक कंत्राटदार/नोंदणीकृत संस्था यांनी निविदा पत्रक/निविदा फॉर्म फी व निविदा बयाणा रक्कम ऑनलाईन रिसिप्ट सिस्टीमद्वारे भरणा करावी. अन्यथा दरपत्रके / निविदा ग्राह्य समजण्यात येणार नाही. निविदेचा तांत्रिक लिफाफा क्र.०१ दि. ०३/०९/२०२४ रोजी सायं ४.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, आस्थापना विभाग, तिसरा मजला, भाईंदर (प.) येथे उघडण्यात येईल.
आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी कोणत्याही प्रकारच्या ऑनलाईन निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत अंतिम अधिकार राखुन ठेवला आहे.
इच्छुक पुरवठादारांनी पुढे नमुद केलेला अनुभव विचारात घेवून प्रती कर्मचारी आपले दर किमान वेतन दर गृहीत धरून सर्व करांसहित नमुद केलेले असून, कंत्राटदाराने सर्विस चार्ज/प्रशसकीय चार्ज नमुद करावेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कोऱ्या निविदा पत्रकाची किंमत | निविदा बयाणा (EMD)रक्कम |
|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी ठेका पध्दतीने मजूर पुरवठा करणेकामी (किमान वेतन कायद्यानुसार कार्यवाही) (कालावधी - ०२ वर्षे) (निविदेचा एकूण खर्च रु. २,६३, १०, ८१६/-) | रु.२७००० + (GST १८%) ४८६०= रु. ३१,८६०/- | रु. २,६३,११०/- (अक्षरी रु. दोन लाख त्रेसष्ठ हजार एकशे दहा मात्र) |

टिप :-
१) निविदा दोन लिफाफा पद्धतीने ऑनलाईन सादर कराव्यात.
२) फॉर्म फि परत केली जाणार नाही.
३) आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्तांनी राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.
४) निविदा विधी ग्राहयता कालावधी १२० दिवसांचा असेल.

जा.क्र. मनपा । मावज/ई २६१२५१४/२०२४-२५
दि. १७/०८/२०२४
(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

स्वा/-
(रवि पवार)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.

■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट




■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर

■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा शानदार शुभारंभ; बहिणींच्या आनंदसोहळ्यात मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री सहभागी

### लाडक्या भावाकडून रक्षाबंधानाची ओवाळणी मिळाल्याने महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण

# लाडक्या बहिणींच्या जीवनात सुखाचे-आनंदाचे क्षण यावे हीच या भावाची इच्छा-मुख्यमंत्री

पुणे : महिलांच्या ढोल आणि लेझीम पथकाचे सादरीकरण, उत्सवाच्या वातावरणात सजलेला आणि महिला भगिनींनी फुललेला शिवछत्रपती क्रीडानगरीचा परिसर, महिलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद आणि मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी महिलांना दिलेल्या शुभेच्छा अशा उत्साहपूर्ण वातावरणात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'चा पुणे येथे राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावे हीच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा अहेर मिळणार आहे, अशा भावपूर्ण शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछपत्रपती क्रीडानगरी येथे झालेल्या या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बाल विकास मंत्री कु. आदिती तटकरे आदी उपस्थित होते.




### योजनेमुळे महिलांना दिलासा मिळेल-डॉ.नीलम गोऱ्हे

तीन दशकाच्या महिला धोरणाच्या इतिहासात या कार्यक्रमाच्या कार्यक्रमपत्रिकेत मान्यवरांच्या नावापुढे आईचे नाव लावल्याबद्दल समाधान व्यक्त करून विधान परिषद उपसभापती डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, महिलांची संख्या निम्मी असून दोन तृतीयांश तास त्या काम करतात. जगातील १ टक्के संपत्ती महिलांच्या नावावर आहे. अशा स्थितीत या योजनेमुळे महिलांना निश्चितपणे दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रबोधनाची परंपरा आणि महिला विकासाचा वारसा असलेल्या पुण्यात या योजनेचा समारंभ होत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

### योजनेद्वारे २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न-कु. आदिती तटकरे

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंत्री कु.तटकरे यांनी केले. दोन दिवसांनी रक्षाबंधन साजरा होणार आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या तीन लाडक्या भावांनी आधीच ओवाळणी दिली. या योजनेला उदंड प्रतिसाद मिळाला. १ कोटी ३५ लक्ष महिला लाभासाठी पात्र ठरल्या, त्यापैकी १ कोटी ३ लक्ष महिलांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली आहे. प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, ग्रामसेवक आदींनी यासाठी खूप परिश्रम केले. २ कोटींपेक्षा अधिक महिलांना लाभ देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक विजेत्या स्वप्नील कुसळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना मार्गदर्शन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'यशस्विनी प्लॅटफॉर्म' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात योजनेच्या धनादेशाचे आणि स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले.

### महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू – देवेंद्र फडणवीस

राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी असा केंद्र आणि महाराष्ट्र शासनाचा प्रयत्न आहे. यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्थाही वेगाने वाढणार असून महिलांचा सन्मान करणारा महाराष्ट्र घडवून दाखवू, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी मार्च २०२५ पर्यंतची तरतूद केली असून पुढेही दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, आजचा हा सावित्रींच्या लेकींचा कार्यक्रम आहे. पुणे ही समाजकारणाची आणि परिवर्तनाची भूमी आहे. त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची सुरूवात पुण्यापासून केली जात आहे. हे सरकार बहिणींना लाभ देणारे सरकार आहे. १ कोटी ३ लाख महिलांच्या खात्यात योजनेचे पैसे कार्यक्रमापूर्वीच जमा झाले आहेत. ऑगस्टमध्ये ज्या महिलांच्या अर्जाची छाननी होईल, त्यांना जुलैपासूनच लाभ मिळेल. सप्टेंबरमध्ये ज्या महिलांच्या अर्जांची छाननी होईल, त्यांनाही जुलैपासूनच लाभ मिळेल. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि सचिव अनुपकुमार यादव यांच्या नेतृत्वात अतिशय गतीने योजनेचा लाभ देण्याचे काम झाले आहे.

विकसित भारत करणे हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे स्वप्न आहे. महिलांचा विकास झाला, तरच भारत विकसित होऊ शकतो असे प्रधानमंत्री कायम म्हणतात. त्यामुळेच केंद्र आणि राज्यात आम्ही स्त्रीकेंद्रित योजना सुरू केल्या. लखपती दिदी, लेक लाडकी, शिक्षण शुल्क माफी योजना आणि लाडकी बहीण योजना या दृष्टीकोनातूनच सुरू करण्यात आल्या गेल्या. राज्याच्या अर्थव्यवस्थेत महिलांची भागीदारी असावी, असा आमचा प्रयत्न आहे.

### भावांकडून बहिणीला ओवाळणी-उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, राज्यातील महिलांना अधिक सक्षम, सबल करण्यासाठी त्यांना मान, सन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्याकरीता अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. या योजनेला माता-भागिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. आजपर्यंत १ कोटी ३ लाख रुपये माता-भागिनींच्या बँक खात्यात जुलै व ऑगस्ट महिन्याचे मिळून ३ हजार रुपये जमा करण्यात आले आहे. या महिलांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान, हसू दिसून येत आहे. भाऊबीज सणानिमित्ताने ओवाळणी म्हणून भेट दिली आहे.

माता-भगिनी जीवन जगताना त्यांच्या आशा अपेक्षा असतात परंतु स्वतःचे हीत बाजूला ठेवून कुटुंबाच्या भल्याकरीता त्या काम करीत असतात. या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या आशा-अपेक्षापूर्तीसाठी काम करण्यात येत आहे. यापुढेही या योजनेत सातत्य राहणार असून एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुलींना मोफत व्यवसायिक शिक्षण अशा विविध योजना सुरू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या हिताकरीता बेरोजगारी कमी करण्यासाठी, सर्व सामान्य नागरिकांचे जीवन सुखकर करण्यासाठी, मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी केंद्र व राज्य शासन मिळून काम करीत असून नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन पवार म्हणाले.

# कल्याण डोंबिवली शहराच्या विकासासाठी ठाण्याच्या धर्तीवर योजना राबवा : मुख्यमंत्री

### कल्याण डोंबिवली परिसराची भविष्यातील पाण्याची गरज ओळखून नियोजन करा मुख्यमंत्र्यांचे निर्देश



मुंबई : मुंबई, ठाण्यानंतर आता कल्याण- डोंबिवली या शहरात वेगाने विकास होत आहे. हे लक्षात घेऊन येथील नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ठाणे शहराप्रमाणे सर्व योजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व यंत्रणांना दिले. तसेच भविष्यात कल्याण डोंबिवली परिसराला लागणारी पाण्याची गरज भागू शकेल याकरिता महापालिका, जलसंपदा विभाग यासह इतर यंत्रणांनी समन्वयाने मार्ग काढावा, असे ही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक पार पडली. बैठकीस खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय.एस. चहल, विकास खारगे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, उद्योग विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, कल्याण डोंबिवली महापालिकेच्या आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की कल्याण शहरात वेगाने नवीन बांधकामे होत आहे. त्यामुळे नवीन लोकसंख्येची भर पडणार आहे. या वाढणाऱ्या भागात पाणी पुरवठा करणे गरजेचे आहे. यासाठी जलसंपदा विभागाकडून सध्या अतिरिक्त म्हणून दिले जाणारे पाणी नियमित करण्यात यावे. एमआयडीसीने देखील पुनर्प्रक्रिया केलेले पाणी उद्योगांना पुरवुन चांगले पाणी महापालिकेला पिण्यासाठी उपलब्ध करून द्यावे. भविष्यातील पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन या भागासाठी प्रस्तावित धरणांची कामे वेगाने मार्गी लावावीत, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच कल्याण डोंबिवली महापालिकेत समाविष्ट २७ गावातील जे रहिवासी कल्याण डोंबिवली महापालिकेत कंत्राटी पद्धतीने काम करत आहेत त्यांना सेवेत कायम करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच या गावातील अनधिकृत बांधकामांना क्लस्टरचा दर्जा देऊन त्यांना नियमित करण्याबाबत प्रस्ताव पाठवावा, असेही त्यांनी सांगितले. सोबतच कल्याण डोंबिवली शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास वेगाने करण्यासाठी त्यांचेही ठाणे शहराच्या धर्तीवर क्लस्टर करून विकास करण्यासाठी पाऊले उचलला, अशा सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. डोंबिवलीतील पेंढारकर महाविद्यालयाचा प्रश्न सोडवून विद्यार्थी आणि शिक्षकांना न्याय देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाला निर्देश दिले.

बैठकीला कल्याण डोंबिवली शहरातील विविध राजकीय, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# बांधकाम व्यावसायिकाने उभारलेल्या बेकायदा झोपड्यांवर कारवाई

नवी मुंबई : सीवूड्स विभागात पालिका व सिडकोच्या मोकळ्या जागेत शनिवारी सकाळी सीवूड्स रेल्वेस्थानक परिसरात सेक्टर २५ येथील पालिकेच्या मल:निसारण केंद्रजवळील भूखंडाभोवती हिरव्या जाळीचे कुंपण लावून बेकायदा झोपड्या उभारल्या जात होत्या. परंतु पालिकेच्या बेलापूर विभाग सहाय्यक आयुक्त यांना बेकायदा कामाबाबत माहिती देताच तात्काळ तोडक कारवाई करण्यात आली आहे.

पालिकेचा अतिक्रमण विभागही 'अलर्ट मोड'वर असून पालिकेने नुकतेच मुख्यालय स्तरावर केंद्रीय अतिक्रमण पथक स्थापन केले आहे. बांधकाम व्यावसायिकाकंडून मात्र मनमानी करण्यात येत असून सीवूड्स सेक्टर २५ येथे नवीन टॉवरचे काम सुरू असून याच ठिकाणी विकासकाकडून बेकायदा लेबर कॅम्प उभारण्यात येत असल्याने अतिक्रमण विभागाने या झोपड्यांवर कारवाई केली आहे.

सीवूड्स सेक्टर २५ येथील एका बांधकाम व्यावसायिकाचे काम सुरु असून बांधकामाच्यासाठी लागणाऱ्या कामगारांसाठी लेबर कॅम्प बनवण्यात येत होता. पालिकेने तक्रार प्राप्त होताचा तात्काळ कारवाई करण्यात आली असून बेकायदा झोपड्यांवर कारवाई केली.
**-शशिकांत तांडेल,** सहाय्यक आयुक्त, बेलापूर विभाग




ठाण्यातील मानपाडा येथील टिकुजिनीवाडी,हॅप्पी व्हॅली परिसरात रस्त्याच्या दुतर्फा होणाऱ्या अनधिकृत पार्किंग विरोधात स्थानिक नागरिकांनी मोर्चा काढत दुकानदारांना फुल देत गांधीगिरी पद्धतीने आंदोलन केले. (छाया : मनोज सिंह)

# तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या, निवडणूक आयोगाचे आदेश; मंगळवारपर्यंत मुदत

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकाच विधानसभा मतदारसंघात तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण झालेल्या किंवा त्याच शहरातील मूळ रहिवासी असलेल्या महसूल, पोलीस, उत्पादनशुल्क, महापालिका, महामंडळातील अधिकाऱ्यांच्या बदल्या तातडीने येत्या मंगळवारपर्यंत करण्याचा आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुका मुक्त आणि मोकळ्या तसेच पारदर्शी वातावरणात पार पडाव्यात यासाठी निवडणूक प्रक्रियेशी संबंधित महसूल आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. त्यानुसार एकाच पदावर तीन वर्षांचा कार्यकाल पूर्ण केलेल्या किंवा गृह जिल्हा असलेल्या पोलीस दलातील आयुक्त, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपायुक्त, निरीक्षक, उपनिरीक्षक आदी तसेच जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी अशा महसूल अधिकाऱ्यांच्या तसेच विभागीय आयुक्त, पालिका आयुक्त, महामंडळांमध्ये प्रतिनियुक्तीवर नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले आहेत. यापूर्वी बदल्यांच्या या नियमातून पालिका आयुक्त आणि महामंडळातील अधिकाऱ्यांना सूट होती, मात्र लोकसभा निवडणुकीपासून या अधिकाऱ्यांनाही निवडणूक आयोगाने बदल्यांचे नियम लागू केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या या आदेशानंतर मंत्रालयात तसेच पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीस पात्र अधिकाऱ्यांचा शोध सुरू झाला असून येत्या दोन दिवसांत अशा अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले जातील अशी माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली. आयोगाच्या आदेशान्वये शनिवारी उत्पादन शुल्क विभागातील सात अधीक्षकांसह ७० अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यांना त्वरित बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यास बजावण्यात आले आहे. तसेच बदलीच्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या अधिकाऱ्यांवर आयोगाच्या आदेशानुसार कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

# डहाणू तालुक्यात पुन्हा भूकंपाचे धक्के

कासा : डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी, कासा, गंजाड परिसरात आज (१७ ऑगस्ट) पहाटे ६.३५ वाजताच्या सुमारास तीव्र आणि सौम्य स्वरूपाचे दोन भूकंपाचे धक्के बसले आहेत. भूकंपामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज पहाटे ६.३५ च्या सुमारास भूकंपाचा पहिला धक्का बसला असून ६.४० च्या सुमारास दुसरा सौम्य धक्का जाणवला. दोन धक्क्यांपैकी एकाची तीव्रता ३.६ रिष्टर स्केल इतकी नोंदविण्यात आली असून याची खोली १० किलोमीटर इतकी आहे. तर दुसरा धक्का हा सौम्य असल्यामुळे त्याची नोंद झाली नसल्याची माहिती मिळत आहे. पालघर जिल्ह्यात २०१८ पासून भूकंपाचे धक्के बसण्याचे प्रकार सुरू आहेत. मध्यंतरी भूकंपाचे प्रमाण कमी झाल्यामुळे धोका टळल्याची शक्यता व्यक्त होत होती. मात्र पुन्हा भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे भूकंपाचे सत्र पुन्हा सुरू होण्याची भीती व्यक्त होत असून भूकंप प्रवण क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भूकंपाचे धक्के जाणवल्यानंतर त्या संदर्भातील माहिती मिळवण्यासाठी शासकीय यंत्रणा प्रयत्नशील होती. मात्र किमान दोन तास त्याविषयी संबंधित संकेतस्थळावर माहिती उपलब्ध न झाल्याने हे धक्के सौम्य असावेत असा शासकीय यंत्रणेचा समज झाला. मात्र नंतर भूकंप संकेतस्थळावर घडलेल्या भूकंपाची तीव्रता निर्देशित करण्यात आल्यानंतर ३.६ तीव्रतेचा भूकंप झाल्याचे स्पष्ट झाले. शासकीय संकेतस्थळावर याचा प्रभाव व्यापक दृष्टीने दिसत असला तरी त्याची तीव्रता डहाणू तालुक्यात जाणवल्याचे सांगण्यात आले.

# मदनसिंग मनवरसिंग उद्यानाकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉँक्रिटीकरण व गटारीच्या कामाचा शुभारंभ

**कॉँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी व नागरिकांच्या हस्ते कामाचा शुभारंभ**



अंबरनाथ (नवाज वणू) : अंबरनाथ पश्चिमेकडील वॉर्ड क्रं. २३ मधील मदनसिंग मनवरसिंग उद्यानाकडे जाणाऱ्या रस्त्याची व बाजूलाच असणाऱ्या गटारीची खूपच दुरावस्था झाली होती. या रस्त्यावरून ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, शाळकरी मुले यांना तारेवरची कसरत करत वाट काढत त्रासाला सामोरे जावे लागत होते. विशेष म्हणजे गेल्या २५ वर्षांपासून किशोर सिद्धी क्रीडा मंडळाच्या वतीने याठिकाणी गणेशोत्सव देखील साजरा केला जातो.

हि बाब येथील नागरिकांनी कॉँग्रेसचे माजी नगरसेवक विलास हरिभाऊ जोशी यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी अंबरनाथ नगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून मदनसिंग मनवरसिंग उद्यानाकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉँक्रिटीकरणाचे काम मंजूर करून घेतले. रस्त्याच्या व बाजूलाच असणाऱ्या गटाराच्या कामाचे शनिवारी शुभारंभ कॉँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला व कामाला सुरुवात देखील करण्यात आली आहे.

कॉँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी, शौकतअली शेख यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना मंडळाच्या वतीने शॉल देऊन सन्मान करण्यात आला. तर विलास जोशी यांच्या प्रयत्नाने हे काम झाल्याने जोशी यांचा नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर सदरचे काम करण्यासाठी अंबरनाथ नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. प्रशांत रसाळ, राजेंद्र हवाल, शहर अभियंता कुंभार, पंकज पन्हाळे, विनोद राठोड, प्रशांत माने, सुनीलकुमार जाधव, प्रशांत पवार यांनी विशेष सहकार्य केल्याने त्यांचे कॉँग्रेसचे माजी नगरसेवक विलास जोशी यांनी आभार मानले.

याप्रसंगी कॉँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी, माजी नगरसेवक विलास हरिभाऊ जोशी, जमसु नजरत, शौकतअली शेख, प्रकाश कासोटे, मजीद शेख, रामनगिना गुप्ता, मोहम्मद रफिक शेख, सतीश सुळे, भरत मुदलियार, राजेश मुदलियार, गिल्बट परेरा, चांद शेख, जाफर खान, चांद काझी, अली अहमद शेख, शौकतअली शेख अनेक मान्यवर, पदाधिकारी व परिसरातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# १५ ऑगस्ट दिनानिमित्त खारीगांव येथे महिलांना मोफत छत्र्या वाटप





कळवा : शिवसेनेचे उपनेते दशरथ दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व कळवा मुंब्रा सहसंघटक महिला रचना राकेश पाटील यांच्या संकल्पनेतून खारीगाव पारसिक नगर वास्तू आनंद विभागातील महिलांना मोफत छत्र्या वाटप करण्यात आल्या त्याप्रसंगी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंतर्गत ठाणे महिला अध्यक्ष लता पाटील, मा. नगरसेवक उमेश पाटील, उप शहर प्रमुख राकेश पाटील, लोकमाता सावित्रीबाई फुले पतसंस्था अध्यक्ष लीलाताई पाटील, शारदा पाटील, सीमा पाटील, उषा पाटील, कॉज फाउंडेशन अध्यक्ष कल्पना मोरे, ॲडवोकेट चैतन्य केणी, रंजना पाटील, सुशीला लोखंडे, निर्मला कदम, रेशमा दळवी, प्रियंका येरम, नथु पाटील उपस्थित होते. याप्रसंगी रचना पाटील म्हणाला की, स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून महिलांसाठी मोफत छत्र्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. परंतु आज आपल्या देशामध्ये मध्ये महिला सुरक्षित आहेत का गेल्या आठवड्यातच एक भयानक घटना घडली. एका महिला डॉक्टरवरती अत्याचार करण्यात आला डॉक्टर हे नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी असतात त्यांचीच अशी क्रूरपणे हत्या जर केली याला समाजातील विकृती पण म्हणावी लागेल अशा नराधमाना कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच ह्या घटनांमध्ये कोर्टात लवकरात लवकर सुनावणी होवून शिक्षा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

**मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेच्या**

# वचनपूर्ती कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद

ठाणे (गणेश भोईटे) : मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमाचे पुणे येथून थेट प्रेक्षपण ठाणे गडकरी रंगायतन तलावपाळी, ठाणे येथे दाखविण्यात आले. यावेळी ठाण्यात महिलांचा अभूतपूर्व प्रतिसाद पाहण्यास मिळाला.





या कार्यक्रमांचे थेट प्रेक्षपण पाहण्यासाठी या ठिकाणी आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, अध्यक्ष मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना अध्यक्ष राम रेपाळे, श्रीमती लता पाटील, सदस्य भरत चव्हाण, वनिता गोतपगार, अरुणा पेंढारे, सुवर्णा खिल्लारी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, नगरपरिषद संचालक मनोज रानडे, ठाणे महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, अनघा कदम, उमेद प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा पुरवठा अधिकारी विकास गजरे, जिल्हा महिला व बालविकास विभाग अधिकारी महेंद्र गायकवाड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) संजय बागूल आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ठाणे जिल्हातून ५ लाख ४९ हजार ५६ अर्ज प्राप्त झाले आहेत.यापैकी ३ लाख ६० हजार लाभार्थी महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाले आहेत.

ठाण्यातील महिलांनी याप्रसंगी रक्षाबंधनसाठी भाऊ म्हणून आमच्या खात्यात पैसे पाठवले यासाठी मुख्यमंत्री महोदयांचे मनापासून आभार मानले असून या महिला भगिनींनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधण्याची इच्छा व्यक्त केली. आम्ही महिला खूप आंनदी आहोत, असे मत यावेळी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे थेट प्रेक्षपण ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिका व नगरपरिषद येथे दाखविण्यात आला. तेथेही महिलांची उत्स्फूर्त गर्दी पाहण्यास मिळाली.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पुण्यातील वचनपूर्ती कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे अतिशय उत्कृष्ट नियोजन ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, अनघा कदम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बालकल्याण) संजय बागूल यांनी केले होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

# प्रदीप पाटील कॉँग्रेसमधून ६ वर्षांसाठी निलंबित

**ब्लॉक अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील यांची पत्रकार परिषदेत माहिती**



अंबरनाथ : लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान कॉँग्रेसला रामराम ठोकून शिवसेनेत गेलेले कॉँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष प्रदीप पाटील यांना कॉँग्रेसमधून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. प्रदेश कॉँगेस अध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशानुसार प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी पाटील यांच्यावर निलंबनाची कार्यवाही केल्याची माहिती ब्लॉक अध्यक्ष ॲड. कृष्णा रसाळ पाटील यांनी दिली. प्रदीप पाटील यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला, तरीही त्यांनी नंतर पक्षविरोधी कारवाया सुरू ठेवल्या होत्या; याबाबतची माहिती प्रदेश कॉँग्रेसला देण्यात आल्यानंतर प्रदीप पाटील यांना ६ वर्षे कॉँग्रेसमधून निलंबित करण्यात आले आहे.

## छताचे प्लास्टर अंगावर पडून मुलाचा मृत्यू

ठाणे : भिवंडी येथील कारिवली भागात घरामधील छताचे प्लास्टर अंगावर पडून किसन पटेल (१७) याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे भिवंडीत हळहळ व्यक्त केली जात आहे.कारिवली येथील ७२ गाळा परिसरात चार मजली इमारत आहे. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका सदनिकेत किसन हा त्याच्या आई-वडिल, भाऊ आणि बहिणीसोबत भाड्याने वास्तव्यास होता. ही इमारत अतिशय जीर्ण झाली होती. त्यामुळे येथील रहिवासी ही इमारत दुरुस्त करण्यासाठी मालकाला विनंती करत होते. शुक्रवारी रात्री किसन पटेल हा घरामध्ये झोपला होता. त्याचवेळी त्याच्या अंगावर छताचे प्लास्टर कोसळले.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ बघण्यासाठी**

# नवी मुंबई पालिका मुख्यालयात थेट प्रक्षेपण व्यवस्था

नवी मुंबई : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ आज बालेवाडी, पुणे येथे भव्यतम स्वरूपात मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते. उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्रीअजित पवार, महिला व बालविकास मंत्रीश्रीम.आदिती तटकरे आणि इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.



हा समारंभ नवी मुंबईतील महिलांना पहाता यावा यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील म्फिथिएटरमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण बघण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे तसेच योजनेचे बेलापूर विधानसभा क्षेत्र समिती अशासकीय सदस्य विजय माने व श्रीम.कांताबाई घुले आणि उपआयुक्त शरद पवार, किसनराव पलांडे, सोमनाथ पोटरे, डॉ.कैलास गायकवाड व महिला बाल विकास विभागाच्या नवी मुंबई बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीम. ज्योती पाटील आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

योजनेचा लाभ अनेक महिलांच्या बँक खात्यात १४ ऑगस्टपासून डिबीटीव्दारे थेट जमा होण्यास सुरूवात झालेली असून त्याचा आनंद याप्रसंगी उपस्थित अनेक महिलांनी व्यक्त केला. कार्यक्रमानंतर उपस्थित महिलांशी संवाद साधताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ मिळालेल्या महिलांचे अभिनंदन केले व लवकरच इतरही पात्र महिलांना याचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

ठाणे तालुक्यात १ जुलैपासून प्राप्त १ लाख ७७ हजार लाभार्थ्यांमध्ये नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील साधारणत: ५० हजार लाभार्थी होते. त्यामधील अनेक महिलांना लाभ प्राप्त झालेला असून कागदपत्र अपूर्णतेअभावी अंशत: नाकारण्यात आलेल्या ८७१२ अर्जांकरिता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेण्याच्या कामाला गती द्यावी असेही आयुक्तांनी सूचित केले.

**वैद्यकीय उपचारांच्या हलगर्जीपणातून डोंबिवलीतील शिवाजीराव जोंधळे यांचा मृत्यू**

# गिता खरे यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल

कल्याण : डोंबिवलीतील जोंधळे विद्यासमुहाचे अध्यक्ष दिवंगत शिवाजीराव जोंधळे यांना दोन वर्षापूर्वी यकृताचा कर्करोग झाला होता. त्यांना या आजारातून बाहेर काढण्यासाठी पुरेपुर वैद्यकीय उपचार होणे आवश्यक होते. परंतु, शिवाजीराव जोंधळे नियंत्रक असलेल्या विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचिव गिता खरे (शिवाजीराव यांची दुसरी पत्नी) आणि त्यांचा खरे कुटुंबातील मुलगा, मुलगी, सून, जावई यांनी शिवाजीराव यांची मालमत्ता हडप करण्याच्या उद्देशातून त्यांना वेळोवेळी त्रास देऊन वैद्यकीय उपचार घेण्यापासून वंचित ठेवले. शिवाजीराव यांच्यावर कर्करोग आजारातून बरे होण्यासाठी यकृताची प्रत्यारोपण शस्त्रक्रिया गिता खरे यांनी होऊन दिली नाही.

त्यामुळे आपल्या वडिलांच्या मृत्यूस गिता खरे कुटुंब कारणीभूत आहे. हा शिवाजीराव जोंधळे यांचा मुलगा सागर यांचा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने प्रथमदर्शनी मान्य करून गिता खरे यांच्यासह इतर आरोपींवर गुन्हा दाखल करून चौकशी करण्याचे आदेश विष्णुनगर पोलिसांना दिले.

कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाच्या जिल्हा न्यायदंडाधिकारी सायली लम्भाते यांच्या आदेशावरून डोंबिवलीतील विष्णुनगर पोलिसांनी सागर शिवाजीराव जोंधळे यांच्या तक्रारीवरून विघ्नहर्ता ट्रस्टच्या सचिव गिता खरे (शिवाजीराव यांची दुसरी पत्नी), वर्षा देशमुख (शिवाजीराव यांची मुलगी), प्रितम देशमुख (जावई), हर्षकुमार खरे (मुलगा), स्नेहा खरे (सून) यांच्या विरुध्द शनिवारी गुन्हा दाखल केला. न्यायालयाने खरे कुटुंबियांची बाजू ऐकून घेऊन हा आदेश दिला. मानसिक छळ करणे, निष्काळजीपणा, गुन्हेगारी कट रचणे या भारतीय न्याय संहिता कलमाने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, शिवाजीराव यांना कायदेशीर विवाहाच्या वैशाली पत्नीपासून चार अपत्ये होती. समर्थ समाज या शिक्षण संस्थेचे अध्यक्षपद ते सांभाळत होते. या संस्थेत काही वर्षापूर्वी गिता खरे या शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. गिता खरे यांच्या बरोबर शिवाजीराव यांचे अनैतिक संबंध प्रस्थापित होऊन त्यांनी तिच्या बरोबर विवाह केला. त्यांना वर्षा खरे (देशमुख) हे अपत्य झाले. या प्रकाराने शिवाजीराव जोंधळे यांच्या कुटुंबीयांवर अन्याय झाला. शिवाजीराव यांनी स्वमिळकतीमधून आसनगावसह अनेक ठिकाणी जागा घेऊन तेथे शिक्षण संस्थेची उभारणी केली. गिता खरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजीराव यांना ब्लॅकमेलिंग करून, जोंधळे कुटुंबीयांना अंधारात ठेऊन या सर्व मिळकती स्वत:च्या नावावर करून घेतल्या. या विषयावरून शिवाजीराव आणि मुलगा सागर यांच्यात कौटुंबिक वाद निर्माण झाले.

जानेवारी २०२२ मध्ये शिवाजीराव यांना यकृताचा कर्करोग झाला. वितुष्ट दूर सारून मुलगा सागरने त्यांची काळजी घेण्यास सुरुवात केली. चेन्नई, मुंबई, डोंबिवलीतील रुग्णालयात शिवाजीराव यांच्यावर उपचार करण्यात आले. सागर यांची शिवाजीरावांबरोबरची जवळीक खरे कुटुंबीयांना आवडली नाही. सागरने वडिलांसाठी यकृत देण्याची तयारी केली. ती गिता खरे यांनी व्देषातून नाकारली. सागर व शिवाजीराव एक झाले तर आपणास शिवाजीराव यांची मालमत्ता हडप करता येणार नाही म्हणून गिता खरे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजीराव यांना कर्करोगाच्या योग्य उपचारापासून वंचित ठेवले. खोटी कारणे डॉक्टरांना सांगून त्यांना उपचाराविना घरी डांबून ठेवले. या निष्काळजीपणातून शिवाजीराव यांचा एप्रिलमध्ये मृत्यू झाला, असे सागर यांनी तक्रारीत म्हटले आहे.

# कातकरी समाजाच्या कुटुंबाना हक्काची घरे मिळणार, स्वत:ची जमीन देऊन सोडविला प्रश्न : रवींद्र चव्हाण

ठाणे/कल्याण: जिल्ह्यातील कातकरी समाजाचा ७० भटक्या कुटुंबाच्या घरांसाठी जागेची समस्या होती. वर्षानुवर्षे त्यांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित होता. सरकारकडे या समाजातील कुटुंबाना देण्यासाठी जमीन उपलब्ध नव्हती. जेव्हा ही समस्या सिंधुदुर्गनगरी येथील जनता दरबारात मांडण्यात आली त्यावेळी ही समस्या ताबडतोब सोडविण्यात आली. यासाठी आपण स्वतःची ओसरगांव येथील जागा देण्याचा निर्णय घेतला आणि जागा सुद्धा निश्चित करण्यात आली आहे. यामुळे या कातकारी बांधवांना लवकरच हक्काची घरे उपलब्ध होतील, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. जनता दरबारात ८२ अर्ज दाखल झाले होते. पैकी ७४ अर्जाचे निरसन झाल्याचे त्यांनी सांगितले. स्वतःची जमीन देण्याच्या ऐतिहासिक निर्णयामुळे या सर्व कुटुंबांनी पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचे मनापासून आभार मानले आणि असा नेता किंवा मंत्री आम्ही कधीच पाहिला नाही. वर्षानुवर्षे आम्ही भटकत होतो पण आता आम्हाला हक्काचा निवारा मिळाला आणि आता आमच्या सर्व पिढ्या हक्काच्या घरात राहतील त्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे , अशी भावना सर्वांनी व्यक्त केली.

सिंधुदुर्गनगरी येथे जिल्हा नियोजन सभागृहात पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत जनता दरबार झाला. या कार्यक्रमात मंत्री रवींद्र चव्हाण बोलत होते. या प्रसंगी रवींद्र चव्हाण यांच्या सोबत भाजप आमदर नीतेश राणे, जिल्हाधिकारी किशोर तावडे, जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मकरंद देशमुख, पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छींद्र सुकटे, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावळे, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, माजी आ. अजित गोगट आदींसह खाते प्रमुख तसेच कणकवली विधानसभा मतदारसंघातील सरपंच, ग्रामस्थ उपस्थित होते.



जनता दरबार हा प्रसिद्धीसाठी नाही. या पूर्वी सुद्धा जिल्ह्यात असे जनता दरबार होत होते. आज झालेल्या जनता दरबारात ८२ अर्ज दाखल झाले होते. पैकी ७४ अर्जाचे निरसन झाले आहे. सर्वसामान्यांचे तक्रारीचे निरसन होणे हेच खरे या जनता दरबाराचे यश आहे, असे प्रत्युत्तर मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आमदर वैभव नाईक यांच्या टीकेला दिले. आमदर नाईक यांनी पालकमंत्र्याचा जनता दरबार हा निवडणुकांसाठी फार्स असल्याची टीका केली होती.

सार्वजनिक बांधकाम हायवे आणि पाटबंधारे विभागातील सर्व ९ अर्जाचे निरसन केले असून पोलीस प्रशासनाचे दोन्ही अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. ग्रामविकास विभागाअंतर्गत सर्व १६ अर्जाची पूर्तता झाली असून कृषी व आरोग्य विभाग ५, मध्यम पाटबंधारे आणि नियोजन विभाग ३, समाज कल्याण विभाग २, नगर विकास खारभूमी विभाग ६ असे विभागनिहाय अर्ज निकाली काढल्याचे मंत्री चव्हाण म्हणाले. उर्वरित अर्जावर लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्य योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ९ हजार ८५९ युवक – युवतींना रोजगार देण्याचे उद्दिष्ट असून आतापर्यंत १ हजार उमेदवारांना विविध विभागात रोजगार देण्यात आला आहे. उर्वरीत उमेदवारांना रोजगार देण्यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाकडील रोजगार विषयक उपक्रमांची माहिती द्यावी, असे निर्देश ना. चव्हाण यांनी दिले. राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत गाव पातळीवर घराघरात पिण्याचे शुद्ध पाणी पोहोचविण्यात येत आहे. जिल्ह्यात ही योजना प्रभावीपणे सुरू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने अंतर्गत जिल्हयात आतापर्यंत १ लाख ५० हजार ३८३ अर्ज प्राप्त झाले असून त्यातील १ लाख ४४ हजार ८७४ अर्ज पात्र ठरले आहेत. पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या संकल्पनेनुसार सोमवारी कणकवली मतदारसंघातील कणकवली, देवगड व वैभववाडी या तालुक्यातील नागरिकांसाठी सिंधुदुर्गनगरी येथे जनता दरबार झाला. तसेच मंगळवारी कुडाळ – मालवण मतदारसंघातील नागरिकांसाठी आणि बुधवारी सावंतवाडी मतदारसंघातील सावंतवाडी, दोडामार्ग व वेंगुर्ले तालुक्यातील नागरिकांसाठी याच ठिकाणी जनता दरबार संपन्न झाला. या सर्व जनता दरबाराला मोठ्या प्रमाणात चांगला प्रतिसाद मिळाला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१